मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# शरद पवार साहेबांची, ‘तुतारी’ पोचतेय घरोघरी!

## शरदचंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी चिन्ह घरोघरी पोचविण्यात सक्रिय

**। पिंपरी-चिंचवड।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला नुकतेच ‘तुतारी वाजवणारा माणूस’ हे चिन्ह निवडणूक आयोगाकडून देण्यात आल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्वच पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये जल्लोषाचे व चैतन्याचे वातावरण आहे. त्यातच तुतारी हे मंगल वाद्य मुळातच आपल्या महाराष्ट्राच्या संस्कृतीशी जोडलेले असल्याने सर्वसामान्य नागरिकांपर्यंत ते लवकर पोचत असून बहुतांश नागरिकांकडून चिन्हाला पसंती दर्शवली जात आहे. चिन्ह जाहीर झाल्यानंतर पिंपरी चिंचवड मध्ये कार्यकर्त्यांनी मोठ्या जल्लोषात आनंदोत्सव साजरा केला आणि त्यानंतर तुतारी हे चिन्ह व आदरणीय शरदचंद्र पवार साहेब यांचे आजपर्यंतचे उल्लेखनीय कार्य विविध माध्यमांतून पिंपरी चिंचवड शहरातील प्रत्येक नागरिकांपर्यंत पोचविण्यात येत आहे. शहरातील विविध भागांमध्ये होर्डिंग व कियोस्क लावून नागरिकांना आवाहन करण्यात येत असून सोशल मीडियाच्या माध्यमातून सुद्धा तुतारी हे चिन्ह नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचे येत आहे. ज्याला विविध सामाजिक क्षेत्रातील नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. अनेक ज्येष्ठ नागरिक महिला भगिनींकडून शरद पवार साहेबांबद्दल भावनिक व आश्वासक प्रतिक्रियाही दिल्या जात आहेत. नुकतेच निगडी, प्राधिकरण, आकुर्डी, कासारवाडी, दुर्गा टेकडी अशा शहरातील विविध भागांमध्ये शहराध्यक्ष तुषार कामठे, नगरसेविका सुलक्षणा शिलवंत यांच्यासह देवेंद्र तायडे, जयंत शिंदे, विशाल जाधव, मयूर जाधव, अल्ताफ शेख, अरुण थोपटे, गणेश भोंडवे, सागर चिंचवडे, संदेश जगताप, गणेश काळे, वंदना आराख, संगीता खरात, मीनेश काची, अनिल शिंदे, लक्ष्मीकांत गालफाडे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी सर्वसामान्य नागरिकांमध्ये जाऊन थेट संवाद साधत समस्या जाणून घेतल्या. त्यावेळी राजकारणात सध्या चाललेल्या नैतिक दृष्ट्या विघातक कृत्यांबद्दल अनेकांनी नाराजी व्यक्त करत शरदचंद्र पवार साहेबांच्या भूमिकांचे समर्थन केले. येत्या काळात पिंपरी चिंचवड शहरातील मावळ लोकसभा तसेच शिरुर लोकसभा अंतर्गतच्या परिसरात महाविकास आघाडीच्या उमेदवारांना मतदारांनी कौल द्यावा यासाठी सर्वच पदाधिकारी एक विचाराने काम करतील असा निर्धार शहर कार्यकारिणी व पदाधिकाऱ्यांनी केला आहे.



# नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी काँग्रेसचे जनसंवाद आंदोलन

## काँग्रेस पक्ष करदाते नागरीकांच्या दारी जनसंवाद अभियान सुरू

**। पिंपरी-चिंचवड।**
पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा) काँग्रेस पक्षाच्या वतीने शहराध्यक्ष डॉ. कैलास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात प्रत्येक प्रभागात (३२ प्रभाग) काँग्रेस पक्ष करदाते नागरीकांच्या दारी जनसंवाद अभियान सुरू करण्यात आले आहे. याचे उद्घाटन काल (दि.०२ मार्च २०२४) रोजी नरवीर तानाजी मालुसरे पुतळ्यासमोर, दापोडी येथे अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या सचिव तथा महाराष्ट्र काँग्रेसच्या सह प्रभारी सोनल पटेल यांच्या शुभहस्ते करण्यात आले. शहरातील पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा, वैद्यकीय सुविधा, बेरोजगारी, शिक्षण, स्वच्छता, वाहतूक वगैरेंसारखे विविध प्रश्न जटील स्वरूप धारण करीत आहेत. काँग्रेस पक्षाच्या वतीने शहरात वरिल सर्व विषयांबाबत आवाज उठविण्यासाठी हे जन आंदोलन उभे करीत आहोत. कारण महानगरपालिकेची निर्मिती, एम.आय.डी.सी., धरणे, झोपडपट्टी पुनर्वसन योजना, वाय.सी.एम. हॉस्पिटल प्रकल्प, हिंजवडी आयटी पार्क यांसारखे सर्वच प्रकल्प, योजना काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून शहरात आलेल्या आहेत अन् आज शहरात स्मार्ट सिटीच्या नावाखाली सर्वत्र चुकीच्या घटना होत आहे. अशा वेळी काँग्रेस पक्ष शांत बसणार नाही, नागरिकांचा आवाज होऊन जनआंदोलन उभारणार आहे. यावेळी यावेळी ज्येष्ठ पदाधिकारी तानाजी काटे, भाऊसाहेब मुगुटमल, प्रदेश पर्यावरण विभागाचे सरचिटणीस अमर नाणेकर, सेवादल अध्यक्ष ॲड.किरण खाजेकर, चिंचवड ब्लॉक अध्यक्ष ज्ञानेश्वर मलशेट्टी, पिंपरि ब्लॉक अध्यक्ष विश्वनाथ जगताप, भोसरी ब्लॉक अध्यक्ष विठ्ठल शिंदे, पर्यावरण विभाग अध्यक्ष अक्षय शहरकर, झोपटपट्टी सेल अध्यक्ष बी.बी.शिंदे, सामाजिक न्याय विभाग अध्यक्ष ॲड. अशोक धायगुडे, उपाध्यक्ष सोमनाथ शेळके, बाबासाहेब बनसोडे, महेश पाटील, वाहब शेख, अण्णा कसबे, गौतम ओव्हाळ, राधिका अडागळे, सीमा यादव, मिलिंद फडतरे, दिपक श्रीवास्तव, बाबा आलम शेख, हरिश डोळस, सागर ओरसे, ॲड.अनिकेत रसाळ, देवानंद ढगे, रवि कांबळे, मेहबूब शेख, सचिन गायकवाड, राजा वाळूंजकर, राजेंद्र काटे, धनाजी गावडे, वसंत वावरे, भीमराव जाधव, भाऊसाहेब पठारे, अनिल आंग्रे, सोमनाथ गायकवाड, जयंती गायकवाड, सारिका कांबळे, प्रेमा गायकवाड, उजवला मडगूबे, सारिका गायकवाड, शांताबाई यादव आदि उपस्थित होते.

# पोलिओ लसीकरण मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## सुमारे २२३ बालकांना करण्यात आले लसीकरण




**। पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पिंपरी चिंचवड महापालिका वैद्यकिय विभाग यांच्या वतीने आयोजित राष्ट्रीय पोलिओ लसीकरण मोहिमेचे आकुर्डी विठ्ठलवाडी येथील दिवंगत नगरसेवक जावेद शेख स्मृती प्रतिष्ठान या कार्यालयात नियोजन करण्यात आले होते. त्यावेळी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळून आला. यात सुमारे २२३ बालकांना लसीकरण करण्यात आले.आज सकाळी ०८ ते ०५ यावेळेत आयोजित अभियानात आकुर्डी मनपा हॉस्पिटलचे डॉ. बाळासाहेब होडगर, डॉ. दीपक चौधरी, सिस्टर सरला पैठने व लता जगताप व विकास क्षीरसागर यांचे विशेष सहकार्य लाभले. यावेळी प्रत्येक बालकाला चॉकलेट वाटप करण्यात आले. या अभियानाचे नियोजन इखलास सय्यद, तौहीद शेख, प्रकाश परदेशी व शाहरुख शेख, अभिजीत पाटील यांनी केले. तर अभियानाला माजी नगरसेवक प्रसाद शेट्टी व उद्योजक बबनराव मारणे यांनी भेट दिली. याप्रसंगी ज्येष्ठ नागरिक अण्णा कुरहाडे, अण्णा भोसले, ज्ञानेश्वर ननावरे, गौतम बेंद्रे, वसंत सोनार, यशवंत भालेराव, गोविंद राजेशिर्के, सतीश सिलंम आणि चंद्रकांत इंगळे इतर उपस्थित होते.

# क्रीडा स्पर्धेत पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निकचे नेत्रदीपक यश

## खेळाडूंची मार्च महिन्यात होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड



**। पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

महाराष्ट्र राज्य इंटर इंजीनियरिंग डिप्लोमा स्टुडन्ट स्पोर्ट्स असोसिएशन यांच्या वतीने विभागीय पातळीवर एकूण १६ झोन मध्ये आणि राज्य पातळीवर विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. त्यापैकी डी -१ झोनच्या स्पर्धा फेब्रुवारी महिन्यात आयोजित करण्यात आल्या होत्या. यामध्ये पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निक (पीसीबी) मधील विद्यार्थ्यांनी वैयक्तिक व सांघिक गटात नेत्रदीपक यश मिळवले.यामध्ये सांघिक खेळात मुलांच्या गटाने फुटबॉल, टेबल टेनिस, बॅडमिंटन, कॅरम या खेळामध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळविले. तर बास्केटबॉल, हॉलीबॉल आणि बुद्धिबळ यामध्ये द्वितीय क्रमांक मिळवला. सांघिक खेळात मुलींनी कबड्डीमध्ये द्वितीय क्रमांक मिळविला. ॲथलेटिक्स मध्ये मुलांनी १००, २००, ४००, ८०० मीटर मध्ये आणि तिहेरी उडी, लांब उडी, थाळीफेक यामध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळविले. मुलींनी कॅरम आणि बुद्धिबळ स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. मुलींनी ॲथलेटिक्स मध्ये १०० मीटर, ४०० मीटर आणि गोळा फेक मध्ये द्वितीय क्रमांक मिळवला. प्रथम क्रमांक मिळवलेल्या संघाची आणि खेळाडूंची मार्च महिन्यात होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. विजेत्या खेळाडूंचे आणि क्रीडा प्रमुख एस. एस. कदेरे, प्राचार्य व्ही. एस. बॅकोड यांचे पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी अभिनंदन केल्याने पुढील स्पर्धे साठी शुभेच्छा दिल्या.

# यंदा देशात गव्हाचे उत्पादन उच्चांकी?

## गव्हाचे उत्पादन ११४० लाख टनांवर जाण्याचा अंदाज

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** देशातील प्रमुख गहू उत्पादक राज्यांत फेब्रुवारी अखेरपर्यंत थंडी कायम राहिली. गहू उत्पादक राज्यांत अवकाळीसारख्या नैसर्गिक आपत्तींचा फारसा फटका बसला नाही. त्यामुळे यंदाच्या रब्बी हंगामात उच्चांकी ११४० लाख टन गहू उत्पादनाचा अंदाज केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय आणि भारतीय अन्न महामंडळाकडून व्यक्त केला जात आहे.गेल्या वर्षी फेब्रुवारी महिन्यापासूनच उत्तर भारताला उष्णतेच्या झळांचा सामना करावा लागला होता. यंदाही हवामान विभागाने उत्तर भारताला उष्णतेच्या झळांचा सामना करावा लागण्याचा अंदाज व्यक्त केला होता. प्रत्यक्षात उत्तरेकडून येणाऱ्या थंड हवेच्या झंझावातामुळे



गहू उत्पादक पंजाब, हरियाणा, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये फेब्रुवारीअखेरपर्यंत थंडीचे वातावरण राहिले. अवकाळी आणि गारपिटीसारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे पिकाचे नुकसान होण्याचे प्रमाणही कमी राहिले आहे. त्यामुळे यंदाच्या रब्बी हंगामात गव्हाचे उत्पादन ११४० लाख टनांवर जाण्याचा अंदाज केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री अर्जुन मुंडा यांनी व्यक्त केला आहे. या अंदाजाला भारतीय अन्न महामंडळाचे अध्यक्ष अशोक के मीणा यांनी दुजोरा दिला आहे. देशात २०२१-२२ मध्ये १०७७ लाख टन गहू उत्पादन झाले होते. २०२२-२३ मध्ये ३३५.६७ लाख हेक्टरवर गहू लागवड होऊन, सुमारे ११०० लाख टन गहू उत्पादन झाले होते. यंदा २०२३-२४ मध्ये ३३६.९६ लाख हेक्टर क्षेत्रावर गहू लागवड होऊन ११४० लाख टन गहू उत्पादन होण्याचा अंदाज आहे. मध्य प्रदेश, पंजाब आणि उत्तर प्रदेश या प्रमुख गहू उत्पादक राज्यांत उत्पादनात चांगली वाढ होण्याचा अंदाज आहे. केंद्र सरकार भारतीय अन्न महामंडळाच्या माध्यमातून हमीभावाने ३०० ते ३२० लाख टन गहू खरेदी करणार आहे. ही खरेदी हमीभावाने म्हणजे २२७५ रुपये अधिक त्या-त्या राज्यांनी जाहीर केलेल्या २५ रुपये बोनस, असा २३०० रुपये प्रति क्विंटल दराने खरेदी केली जाणार आहे. उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशात गहू काढणी सुरू झाली असून, हमीभावाने खरेदीही सुरू झाली आहे.शक्य यंदाच्या रब्बी हंगामात गहू उत्पादक पट्ट्यात गहू पिकासाठी पोषक असणारी थंडी फेब्रुवारीअखेरपर्यंत राहिली. अवकाळी, गारपिटीचाही फारसा फटका बसला नाही. त्यामुळे गव्हाचे पीक चांगले आहे. मध्य प्रदेश, पंजाब, हरियाणात गहू काढणी सुरू झाली आहे. सरासरीपेक्षा जास्त उत्पादन होण्याचा अंदाज भारतीय किसान संघाचे सरचिटणीस दिनेश कुलकर्णी यांनी व्यक्त केला.गेल्या वर्षी फेब्रुवारी महिन्यापासूनच उत्तर भारताला उष्णतेच्या झळांचा सामना करावा लागला होता. यंदाही हवामान विभागाने उत्तर भारताला उष्णतेच्या झळांचा सामना करावा लागण्याचा अंदाज व्यक्त केला होता. प्रत्यक्षात उत्तरेकडून येणाऱ्या थंड हवेच्या झंझावातामुळे गहू उत्पादक पंजाब, हरियाणा, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये फेब्रुवारीअखेरपर्यंत थंडीचे वातावरण राहिले. अवकाळी आणि गारपिटीसारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे पिकाचे नुकसान होण्याचे प्रमाणही कमी राहिले आहे. त्यामुळे यंदाच्या रब्बी हंगामात गव्हाचे उत्पादन ११४० लाख टनांवर जाण्याचा अंदाज केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री अर्जुन मुंडा यांनी व्यक्त केला आहे. या अंदाजाला भारतीय अन्न महामंडळाचे अध्यक्ष अशोक के मीणा यांनी दुजोरा दिला आहे. देशात २०२१-२२ मध्ये १०७७ लाख टन गहू उत्पादन झाले होते. २०२२-२३ मध्ये ३३५.६७ लाख हेक्टरवर गहू लागवड होऊन, सुमारे ११०० लाख टन गहू उत्पादन झाले होते.

# भोरचे आमदार संग्राम थोपटे खासदार सुप्रिया सुळेंबरोबर!

## लोकसभा निवडणुकीबाबतच्या राजकीय भूमिकेबाबत संभ्रमावस्था

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** कट्टर विरोधक अशी ओळख असलेले अनंतराव थोपटे यांचे चिरंजीव, आमदार संग्राम थोपटे यांच्यानिवडणुकीबाबतच्या राजकीय भूमिकेबाबत संभ्रमावस्था निर्माण झाली असताना आमदार थोपटे, सुप्रिया सुळे यांच्यासमवेत महाविकास आघाडीच्या रविवारी झालेल्या मेळाव्याला उपस्थित राहिले. महाविकास आघाडीबरोबरच असून कायम राहणार असल्याचे थोपटे यांनी स्पष्ट केले.संपूर्ण





महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिलेल्या बारामती लोकसभा मतदारसंघामध्ये सुप्रिया सुळे विरोधात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा अशी लढत रंगणार आहेत. या निमित्ताने वेगाने राजकीय घडामोडी घडत आहेत. सुनेत्रा पवार यांनी शरद पवार विरोधक अशी ओळख असलेल्या माजी मंत्री अनंतराव थोपटे यांची शनिवारी भेट घेतली होती. तसेच थोपटे यांचे चिरंजीव, आमदार संग्राम हे भाजपमध्ये दाखल होणार असल्याची चर्चाही काही दिवसांपासून सुरू आहे. त्यामुळे महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर भोरमध्ये रविवारी झालेल्या महाविकास आघाडीच्या मेळाव्याला खासदार सुप्रिया सुळे यांच्यासमवेत संग्राम थोपटे उपस्थित राहिले. थोपटे गेली काही वर्षे भोरचे आमदार आहेत. बारामती लोकसभा मतदारसंघाअंतर्गत येत असलेल्या भोर विधानसभा मतदारसंघातील मतदान सुप्रिया सुळे यांच्यासाठी महत्त्वाचे ठरणार आहे. भोर विधानसभेतून त्यांना अपेक्षित मतदान झालेले नाही. त्यातच संग्राम थोपटे भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची चर्चा सातत्याने होत आहे. त्यामुळे संग्राम थोपटे यांच्या राजकीय भूमिकेकडेही लक्ष लागले होते. मात्र मेळाव्याला उपस्थित राहून महाविकास आघाडीबरोबर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.काँग्रेस सोडणार असल्याची चर्चा सातत्याने होत आहे. जिल्ह्यातून आणि जिल्ह्याबाहेहूनही तशी विचारणा करणारे दूरध्वनी सातत्याने येत आहेत. खासदार सुप्रिया सुळे यांनी काही दिवसांपूर्वी माझ्या कुटुंबियांची भेट घेतली होती. त्यावेळीही माझी राजकीय भूमिका काय, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता.

# सुनेत्रा पवार सर्वाधिक मतांनी निवडून येतील

## सुप्रिया सुळे विरुद्ध सुनेत्रा पवार अशी लढत होणार : रुपाली चाकणकर



**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील फुटीनंतर शरद पवार आणि अजित पवार या दोन्ही नेत्यांच्या पदाधिकाऱ्यांमध्ये मागील सात महिन्यापासून दररोज आरोप प्रत्यारोप पाहण्यास मिळत आहे. या सर्व घडामोडी दरम्यान लोकसभा निवडणुकीला अगदी काहीच दिवसांचा कालावधी शिल्लक राहिला आहे. अजित पवार,सुनेत्रा पवार हे बारामती लोकसभा मतदारसंघातील अनेक भागात दौरे आणि मेळावे घेत आहे.यामुळे सुप्रिया सुळे विरुद्ध सुनेत्रा पवार अशी लढत होणार असे जवळपास निश्चित मानले जात आहे. यावरून राजकीय वातावरण चांगलेच तापले असून भावी खासदार सुनेत्रा पवार अशा आशयाचे फ्लेक्स खडकवासला मतदारसंघात लागल्याचे पाहण्यास मिळत आहे. याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्ष रुपाली चाकणकर यांना प्रश्न विचारला असता त्या म्हणाल्या की,मागील १५ वर्षापासून त्यांच्यासोबत (सुप्रिया सुळे) मतदार संघात काम केले आहे.तर आता आम्ही १५ वर्षानंतर जनतेचा कौल पाहत असून विकास कामांच्या बाजूने कौल देणारी जनता आहे.या संपूर्ण कालावधीत अजितदादांनी मतदारसंघात काम केली आहेत.तो पेपर कॉपी करून त्या (सुप्रिया सुळे) पास झाल्या आहेत. तसेच बारामतीमधील जनता भावी खासदार म्हणून सुनेत्रा वाहिनीच्या चेहर्याला मान्यता देत आहेत. हे अनेक कार्यक्रमामधून दिसून येत आहे.त्यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीत अजितदादांच्या नेतृत्वाखाली जेवढ्या जागा लढवल्या जातील,त्या सर्व जागांमध्ये सुनेत्रा वाहिनी पवार सर्वाधिक मतांनी निवडून येतील असा विश्वास व्यक्त करीत खासदार सुप्रिया सुळे यांना टोला लगावला.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील फुटीनंतर शरद पवार आणि अजित पवार या दोन्ही नेत्यांच्या पदाधिकाऱ्यांमध्ये मागील सात महिन्यापासून दररोज आरोप प्रत्यारोप पाहण्यास मिळत आहे. या सर्व घडामोडी दरम्यान लोकसभा निवडणुकीला अगदी काहीच दिवसांचा कालावधी शिल्लक राहिला आहे. अजित पवार,सुनेत्रा पवार हे बारामती लोकसभा मतदारसंघातील अनेक भागात दौरे आणि मेळावे घेत आहे.यामुळे सुप्रिया सुळे विरुद्ध सुनेत्रा पवार अशी लढत होणार असे जवळपास निश्चित मानले जात आहे. यावरून राजकीय वातावरण चांगलेच तापले असून भावी खासदार सुनेत्रा पवार अशा आशयाचे फ्लेक्स खडकवासला मतदारसंघात लागल्याचे पाहण्यास मिळत आहे. याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्ष रुपाली चाकणकर यांना प्रश्न विचारला असता त्या म्हणाल्या की,मागील १५ वर्षापासून त्यांच्यासोबत (सुप्रिया सुळे) मतदार संघात काम केले आहे.तर आता आम्ही १५ वर्षानंतर जनतेचा कौल पाहत असून विकास कामांच्या बाजूने कौल देणारी जनता आहे.या संपूर्ण कालावधीत अजितदादांनी मतदारसंघात काम केली आहेत.तो पेपर कॉपी करून त्या (सुप्रिया सुळे) पास झाल्या आहेत. तसेच बारामतीमधील जनता भावी खासदार म्हणून सुनेत्रा वाहिनीच्या चेहर्याला मान्यता देत आहेत. हे अनेक कार्यक्रमामधून दिसून येत आहे.त्यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीत अजितदादांच्या नेतृत्वाखाली जेवढ्या जागा लढवल्या जातील,त्या सर्व जागांमध्ये सुनेत्रा वाहिनी पवार सर्वाधिक मतांनी निवडून येतील असा विश्वास व्यक्त करीत खासदार सुप्रिया सुळे यांना टोला लगावला.

# राज ठाकरे कार्यकर्त्यांवर का संतापले ?

## पदाधिकारी उशिरा पोहोचल्याने राज ठाकरे संतप्त



**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित बैठकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी उशिरा पोहोचल्याने राज ठाकरे संतप्त झाले. बैठकीला पदाधिकारी उपस्थित नसल्याचे लक्षात आल्यानंतर बैठक रद्द करत राज तातडीने मुंबईला रवाना झाले. दरम्यान, असा कोणताही प्रकार झाला नसल्याचा दावा मनसेच्या पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आला.आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मनसेच्या शास्त्री रस्त्यावरील पक्ष कार्यालयात विभाग प्रमुख आणि अन्य काही प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक रविवारी आयोजित करण्यात आली होती. सकाळी अकरा वाजता ही बैठक होणार होती. मात्र या बैठकीची वेळ दुपारी निश्चित करण्यात आली. राज ठाकरे या बैठकीत पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करणार होते. तसेच निवडणूक तयारीचा आढावाही राज यांच्याकडून घेतला जाणार होता. त्यानुसार राज दुपारी पक्ष कार्यालयात पोहोचले. या बैठकीसाठी पक्ष कार्यालयात प्रमुख पदाधिकारी उपस्थित नव्हते. राज ठाकरे पक्ष कार्यालयात आल्याचे समजल्यानंतर पदाधिकाऱ्यांची पक्ष कार्यालयात पोहोचण्यासाठी धावपळ उडाली. पदाधिकारी पक्ष कार्यालयात पोहचेपर्यंत संपत्त राज ठाकरे बैठक न घेता मुंबईकडे रवाना झाले. दरम्यान, असा कोणताही प्रकार झाला नाही. पक्षाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या बैठका सायंकाळपर्यंत सुरू होत्या, असा दावा मनसेचे सरचिटणीस अजय शिंदे यांनी केला.ागामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित बैठकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी उशिरा पोहोचल्याने राज ठाकरे संतप्त झाले. बैठकीला पदाधिकारी उपस्थित नसल्याचे लक्षात आल्यानंतर बैठक रद्द करत राज तातडीने मुंबईला रवाना झाले.